ePaper
# भारताच्या लेकींनी पाकिस्तानला चारली धूळ

वर्ष - 9 । अंक - 171 UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज TM

WWW.MAHAENEWS.COM सोमवार, दि. 16 फेब्रुवारी 2026 पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती MAHAENEWS.COM लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 2 वरुन...

भाजप- काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये राडा!

## पाकिस्तानचा धुव्वा उडवत टीम इंडियाने राखले वर्चस्व

# महामुकाबल्यात भारतच 'किंग'!

महाईन्यूज । कोलंबो

**वर्ल्डकप स्पर्धेत भारत-पाकिस्तान सामना नेहमीच चर्चेत असतो. मात्र प्रत्यक्ष मैदानावर हा सामना एकतर्फी ठरतो, हे पाकिस्तानने पुन्हा एकदा सिद्ध केले. कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवरील संथ आणि धीम्या खेळपट्टीवर भारत राष्ट्रीय क्रिकेट संघने १७५ धावांची मजल मारली. प्रत्युत्तरादाखल खेळताना पाकिस्तान राष्ट्रीय क्रिकेट संघने पॉवरप्लेमध्येच तीन शिलेदार गमावले. त्यानंतर नियमित अंतराने विकेट्स पडत राहिल्या आणि अखेर पाकिस्तानचा डाव ११४ धावांत आटोपला.**

## इशानची तुफानी खेळी; भारताची मजबूत उभारणी

पाकिस्तानने टॉस जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. कर्णधार सलमान अली अघाने पहिल्याच षटकात फिरकी आक्रमण करत अभिषेक शर्माला बाद केले आणि निर्णय योग्य ठरवला. मात्र त्यानंतर इशान किशनने आक्रमक फलंदाजी करत सामन्याची दिशा बदलली. फिरकी आणि वेगवान दोन्ही गोलंदाजांवर तुफानी फटकेबाजी करत इशानने ४० चेंडूत १० चौकार आणि ३ षटकारांसह ७७ धावांची खेळी केली आणि भारताच्या विजयाचा पाया रचला. तिलक वर्माने २४ चेंडूत २५ धावा, तर सूर्यकुमार यादवने २९ चेंडूत ३२ धावा करत डाव सावरला. हार्दिक पंड्याला खाते उघडता आले नाही; मात्र शिवम दुबेने १७ चेंडूत २७ धावा करत धावसंख्या १७५ पर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पाकिस्तानकडून सईम अयुबने ३ विकेट्स घेतल्या.





## भारतीय गोलंदाजांचा कहर; पाकिस्तान ११४ वर गारद

१७६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवातच खराब झाली. साहिबजादा फरहान पहिल्याच षटकात हार्दिक पंड्याच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर जसप्रीत बुमराहच्या भेदक यॉर्करसमोर सईम अयुब निरुत्तर ठरला, तर सलमान अली अघाही बाद झाला. बाबर आझमने डाव सावरण्याचा प्रयत्न केला; मात्र अक्षर पटेलने त्याला त्रिफळाचीत केले. उस्मान खानने ४४ धावांची झुंज दिली; परंतु इतर फलंदाज अपयशी ठरले आणि पाकिस्तानचा डाव ११४ धावांत संपुष्टात आला. भारताकडून हार्दिक पंड्या, जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेत भारताला दणदणीत विजय मिळवून दिला.





# भाजप- काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये राडा!

## आंदोलन अन् दगडफेक; कार्यकर्ते रक्तबंबाळ, गाड्या फुटल्या

**महाईन्यूज । पुणे**

**काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची थेट छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबरोबर तुलना करणारे वक्तव्य केल्यानंतर राज्यात चांगलंच राजकारण तापलं आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर जोरदार टीका केली.**



### हर्षवर्धन सपकाळ यांचं वक्तव्य काय?

हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं की, “छत्रपती शिवाजी महाराजांनंतर त्यांच्या शौर्याप्रमाणेच, त्याच मांदियाळीत टिपू सुलतान आहेत. टिपू सुलतान यांनी इंग्रजांविरोधात लढा पुकारला होता. टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे एक योद्धे होते. ते भारताचे भूमिपूत्र होते. त्यांनी कधीही विषारी, विखारी विचारांना जवळ केलं नाही. ते एक शौर्याचं लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष बघितलं पाहिजे”, असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं होतं.

दरम्यान, हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध करत भाजपाच्या कार्यकर्त्यांकडून आज राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. पुण्यात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आज आंदोलन केलं. मात्र, यावेळी भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याने मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं.

भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पुणे काँग्रेस भवनाच्या बाहेर आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आंदोलनावेळी दगडफेक आणि बाटल्या फेकल्याचा आरोप काँग्रेसने केला असून यामध्ये काही कारच्या काचा फुटल्या, तसेच गाड्यांचं मोठं नुकसान झालं आहे. तसेच काँग्रेसच्या एका कार्यकर्त्याला दगड लागल्याने तो रक्तबंबाळ झाल्याचीही माहिती समोर येत आहे.

दरम्यान, भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्यामुळे पुण्यात काही वेळ मोठा गोंधळ आणि तणाव निर्माण झाला होता. मात्र, त्यानंतर पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवलं असून आता तणावपूर्ण शांतता आहे. काँग्रेस भवनाच्या बाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्यामुळे काही वेळ मोठा गोंधळ आणि तणाव निर्माण झाला होता. यानंतर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन भाजपाच्या पदाधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

### भाजपाने काय म्हटलं?

भाजपाच्या एका पदाधिकाऱ्याने माध्यमांशी बोलताना म्हटलं की, ‘काँग्रेसकडून आधी दगडफेक करण्यात आली. काँग्रेसचे लोक आक्रमक होऊन आमच्या अंगावर येण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी केला’, असा आरोप भाजाच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

### प्रशांत जगताप काय म्हणाले?

“आजचा दिवस हा एकदम वाईट दिवस आहे, कारण पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षाच्या कार्यालयावर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला”, असं प्रशांत जगताप यांनी म्हटलं आहे.

# पुणेकरांसाठी दिलासा! विद्यापीठ चौक उड्डाणपूल तीन दिवसांत सुरू

**महाईन्यूज । पुणे**

**‘सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल येत्या तीन दिवसांत सुरू झालेला दिसेल. त्याचे लोकार्पण मंगळवारपर्यंत होईल,’ अशी माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी शनिवारी सरहद संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना दिली.**



### हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो दोन महिन्यांत

‘हिंजवडीपासून शिवाजीनगरपर्यंतच्या मेट्रो प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. येत्या एक किंवा दोन महिन्यांमध्ये ही मेट्रो सुरू झालेली दिसेल,’ असा विश्वास पुणे महानगर विकास प्राधिकरणाचे आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी व्यक्त केला.

‘कोणताही औपचारिक कार्यक्रम आयोजित न करता हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत,’ असे म्हसे यांनी सांगितले. हा उड्डाणपूल खुला झाल्यावर चौकातील कोंडी फुटण्यास मदत होणार आहे. पुणे महापालिका आणि पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या वतीने करण्यात येत असलेली अनेक विकास कामे निर्णायक टप्प्यावर आली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

म्हसे म्हणाले, ‘अतिशय गरीब वर्गासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून जवळपास दहा हजार घरे बांधण्यात आली आहेत. त्यातील चार हजार घरांचे वाटप करण्यात आले असून, साडेसहा हजार घरांच्या वाटपाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मार्च महिन्यामध्ये ही सर्व कामे पूर्ण होतील.’

‘पुण्याच्या भोवताली शहरीकरण वाढते आहे. एक लाखापासून पाच लाखापर्यंत लोकसंख्या असलेल्या शहरालगतच्या सुमारे ५७ गावांची निवड करून, तिथे मलनिस्सारणाची कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी ‘अंडरग्राउंड ड्रेनेज सिस्टीम’चे काम हाती घेण्यात आले असून, सुमारे १२०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. येत्या एक ते दोन महिन्यांत या कामांचा कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) जाहीर करण्यात येईल,’ असेही त्यांनी नमूद केले.

‘पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराबरोबरच जिल्ह्यासाठी जीवनदायिनी असलेल्या इंद्रायणी, पवना आणि मुळा-मुठा या नद्यांची अवस्था सर्वांसमोर आहे. त्यांना नदी म्हणावे का, अशी परिस्थिती आहे. या तिन्ही नद्या प्रदूषणमुक्त करण्याचे काम हाती घेतले असून, त्यातील इंद्रायणी नदीसाठी सुमारे ७५० कोटी आणि पवना नदीसाठी २५० कोटी रुपयांची कंत्राटे काढण्यात आली आहेत. मुळा-मुठा नदीसाठी ९०० कोटी रुपयांचे कंत्राटासाठीची निविदा पुढच्या काही महिन्यांमध्ये प्रसिद्ध झाल्याचे दिसेल,’ असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# हिंजवडीसह सात ग्रामपंचायतींवर ‘प्रशासक राज’

## कर महसूल मोठा, राजकीय चढाओढ वाढणार; सध्या प्रशासकीय व्यवस्था कार्यरत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आयटी उद्योगनगरी म्हणून वेगाने विस्तारत असलेल्या हिंजवडीसह परिसरातील सात ग्रामपंचायतींचा पाच वर्षांचा कार्यकाळ अधिकृतरीत्या संपुष्टात आला आहे. सरपंच, उपसरपंच व सदस्यांची मुदत पूर्ण झाल्याने संबंधित ग्रामपंचायतींचा कारभार आता प्रशासकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.**








रविवार (ता. ८) पासून माण, हिंजवडी, मारुंजी, जांबे, कासारसाई तसेच नांदे, चांदे आणि घोटावडे या ग्रामपंचायतींमध्ये लोकनियुक्त प्रतिनिधींच्या जागी प्रशासकीय व्यवस्था कार्यरत झाली आहे.

मुळशी पंचायत समितीत कार्यरत असलेल्या विस्तार अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याकडे तात्पुरता कारभार सोपविण्यात आला असून, दैनंदिन कामकाज, आर्थिक व्यवहार आणि विकासकामांचे निर्णय आता प्रशासनामार्फत घेतले जाणार आहेत.

या भागात बहुतेक आयटी कंपन्या असल्याने या परिसरातील ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत. कररूपी कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्वासाठी मोठी स्पर्धा पाहायला मिळते. आगामी निवडणुकांमध्ये सरपंच थेट जनतेतून निवडला जाणार असल्याने राजकीय चढाओढ आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत. मुळशी तालुक्यात नुकत्याच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका पार पडल्या असून, त्यानंतर आता ग्रामपंचायत निवडणुकांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अनेक पुढाऱ्यांनी नुकत्याच झालेल्या निवडणुकी प्रचारादरम्यान स्वतःचेही ब्रँडिंग आणि प्रचाराचा दुहेरी संगम साधला होता.

### निवडणुका पुढे ढकलल्या

बारावी व दहावीच्या परीक्षा कालावधीमुळे ग्रामपंचायत निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकण्यात आल्या आहेत. एप्रिल किंवा मे महिन्यात निवडणुका होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तोपर्यंत मूलभूत सुविधा सुरळीत राखणे व विकासकामांना गती देणे हे प्रशासकीय यंत्रणेसमोर मोठे आव्हान राहणार आहे. विशेषतः वाढती लोकसंख्या, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते आणि कर संकलन या बाबींवर प्रशासनाची कसोटी लागणार आहे.



# विलंबानंतर महापौरांसह सर्वांची माहिती ऑनलाइन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर अखेर महापौर, उपमहापौर, सत्तारूढ पक्षनेते आणि विरोधी पक्षनेते यांची छायाचित्रे, माहिती व संपर्क क्रमांक प्रसिद्ध करण्यात आले असून नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

महापालिकेत प्रशासकीय राजवट संपून शुक्रवार (दि. ६) पासून लोकप्रतिनिधींचे राज्य सुरू झाले. महापौरपदी रवी लांडगे, उपमहापौरपदी शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेतेपदी प्रशांत शितोळे व विरोधी पक्षनेतेपदी भाऊसाहेब भोईर यांची निवड झाली. मात्र आठवडाभर संकेतस्थळावर केवळ महापौराचे छायाचित्र होते, इतर पदाधिकाऱ्यांची माहिती नव्हती. यामुळे आयुक्तच प्रमुख असल्याचा संदेश जात असल्याची टीका होत होती.

वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर प्रशासनाने तातडीने दखल घेत नगर सचिव, जनसंपर्क व माहिती तंत्रज्ञान विभागांच्या मदतीने सर्व पदाधिकाऱ्यांची छायाचित्रे, दालनाचा पत्ता, संपर्क क्रमांक व ई-मेल आयडी संकेतस्थळावर अपडेट केले. महापौरांच्या नावातील दुरुस्तीही करण्यात आली असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# काळेवाडी परिसरात चेन स्नॅचिंग करणारी टोळी गजाआड...

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**काळेवाडी परिसरात चैन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपींना काळेवाडी पोलिसांनी अटक केली. त्यांच्या ताब्यातून तब्बल सहा लाख, पाच हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संजय नरसिंमलू नक्का (वय २९, रा. सोमेश कॉलनी, नांदेड), आदर्श अनिल कामठीकर (वय २५, रा. महावीर चौक, नांदेड) आणि संजू किसन गुडमलवार (वय २४, रा. गुरुद्वारा गेट नंबर दोन जवळ, नांदेड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.**




काळेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र बहिरट यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे सूचनेनुसार चैन स्नॅचिंगच्या तपासाकरिता विशेष पथक तयार केले. सहायक पोलीस निरीक्षक वैभव गुरव व पथकाने गुप्त माहिती तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे जालना जिल्ह्यातील व एका गावातून आरोपींना पल्सर मोटारसायकलसह ताब्यात घेतले. सुरुवातीला त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. मात्र पोलिसांनी सखोल चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली.

आरोपी हे मूळचे नांदेड येथील असून त्यांना जालना येथून अटक करण्यात आली. अटक आरोपींकडून २१.५३० ग्रॅम वजनाचे ३.७९ लाखांचे सोन्याचे मंगळसूत्र, पाच पल्सर व दोन स्प्लेंडर अशा सात मोटारसायकली, दोन मोबाइल हँडसेट व खंजर असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींनी काळेवाडी हद्दीत अनेक चैन स्नॅचिंग व वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून सात गुन्हे उघडकीस आले आहेत. पुढील तपास काळेवाडी पोलीस करीत आहेत.



## भूमिका

**शुद्ध व्यावहारिक विषयांस राजकीय हेतूने भावनिक वळण लावण्याचा अव्यापारेषु व्यापार तो अंतिमतः स्वतःवरच उलटू शकतो. भारतीय जनता पक्षास ही बाब आता कळावयास हरकत नाही. अमेरिका आणि भारत यांच्यात व्यापार करार या विषयावर चर्चा सुरू आहे. हा विषय असा आहे की ज्यात फायद्यातोट्याची गणिते तपासली जातात.**

# व्यावहारिक विषयांचे भावनिक राजकारण



त्या त्या क्षेत्रातील जाणकार, माध्यमांतील अभ्यासक या झालेल्या/ न झालेल्या कराराचा मसुदा उलगडून दाखवतात. तसे करताना व्यवहार, जमा/खर्च हाच त्या विच्छेदनाचा आधार असतो. देशातील अनेक नामांकित अर्थवेत्ते या करारातील त्रुटी दाखवू लागले असून हा करार आपल्यापेक्षा अमेरिकेस अधिक फायदेशीर आहे, असे सोदाहरण सिद्ध करू लागले आहेत.

यात सोदाहरण हा शब्द महत्त्वाचा. कारण ही अशी उदाहरणे ही विश्लेषकाच्या वस्तुनिष्ठतेचा आधार असतात. म्हणजे तसे पाहू गेल्यास यातही भावनेस थारा असायचे कारण नाही. पण तरीही लोकसभेमध्ये या करारावर आपल्या घणाघाती आणि सत्ताधाऱ्यांस अस्वस्थ करणाऱ्या भाषणात राहुल गांधी यांनी 'भारतमाता' आणली आणि ती विकण्याचा आरोप सत्ताधाऱ्यांवर केला. देशास मातृभूमी मानण्याच्या संस्कारातून 'भारतमाता' ही प्रतिमा विकसित केली गेली.

सुस्नात, मोकळे केस सोडून, एका हातात तिरंगा घेतलेली आणि दुसऱ्या हाताने आशीर्वाद देणारी, लाल लुगड्यातील ही भारतमाता ही कविकल्पना. राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात सत्ताधाऱ्यांवर टीका करताना तिलाच मैदानात आणल्याने सत्ताधारी गडबडले आणि त्यांनी विरोधी पक्षनेत्यावर आरोपांचा प्रतिहल्ला केला. ते ठीक. आपापले राजकारण करण्यास दोन्ही पक्ष समर्थ आहेत. पण मुद्दा आहे तो ही शुद्ध व्यावहारिक चर्चा राहुल गांधी यांनी अचानक भावनिक का केली?

या प्रश्नाचे उत्तर माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी अमेरिकेशी केलेल्या अणुकरारासारख्या व्यावहारिक मुद्द्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पक्षाने जी भाषा वापरली होती तीत दडलेले आहे. तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग हे या करारासाठी स्वतःचे पद पणास लावण्याची हिंमत दाखवत होते त्यावेळी लोकसभेत बोलताना भाजपचे लालकृष्ण अडवाणी यांनी या कराराची संभावना 'भारताची शरणागती' अशी केली होती.

अमेरिकी ताकदीसमोर, अमेरिकी अध्यक्षांसमोर 'कमकुवत' पंतप्रधान मनमोहन सिंग हे झुकले असाच भाजपचा त्यावेळचा सूर. भाजप नेते तेथेच थांबले नाहीत. "आम्ही सत्तेवर असतो तर हा करार भारताचे हित लक्षात घेऊन केला असता", अशा प्रकारचे विधान अडवाणी यांनी केले आणि सत्ता आल्यास हा करार नव्याने केला जाईल असेही सूचित केले. अडवाणी यांस अभिप्रेत असलेली भाजप सत्ता आली त्यास एक तप झाले. तो करार काही नव्याने केला गेलेला नाही.

या काळात उलट अडवाणींचीच रवानगी मार्गदर्शन मंडळांत झाली. हा करार होता तसाच आहे आणि त्याची अंमलबजावणी कशी करता येईल यासाठी तेव्हा विरोधी पक्षात आणि आता सत्तेत असलेले तळमळीने प्रयत्न करत आहेत.

त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान सिंग यांस अशक्त, दुबळे यासारख्या विशेषणांनी बोल लावण्यात अडवाणींच्या पक्षाने धन्यता मानली खरी.

पण याच कथित दुबळ्या पंतप्रधानांनी अमेरिकावारीनंतर लोकसभेत सविस्तर, अत्यंत अभ्यासपूर्ण भाषण केले आणि अमेरिकेचे त्यावेळचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्याशी काय चर्चा झाली याची साद्यंत माहिती त्यांनी सदनास निर्भयपणे दिली. ऊर्जा सुरक्षा हा आमचा अधिकार आहे; मिळेल त्या मार्गाने आम्ही ती मिळवत राहणारच हा सिंग यांनी बुश यांच्यासमोर केलेल्या निवेदनाचा गाभा होता.

## प्रासंगिक »

### अपमानाचा स्वीकार नको

***गौतम बुद्ध भ्रमण करीत एका गावात आले. त्या गावातील मुख्य व्यक्ती बुद्धांना पसंत करत नसे. जेव्हा त्याला माहिती झाले की, बुद्ध आपल्या शिष्यांसोबत गावात येत आहे तेव्हा त्याने गावातील लोकांना आदेश दिला की, आपल्या घराची दारे बंद ठेवा आणि बुद्धांना भिक्षा देऊ नका.***

त्या व्यक्तीच्या स्वभावाची जाण होती. मार्गात त्याचे घर लागल्यावर ते दाराशी उभे राहून भिक्षा मागू लागले. त्यांचा आवाज ऐकून घरमालक चिडला आणि म्हणाला, "इथून निघा. कामधंदा करत नाही, भिक्षा मागून जगता. कष्ट करून पोट भरा." ते शांतपणे त्याचे अपमानास्पद शब्द ऐकत राहिले. तो थांबल्यावर त्यांनी विचारले, "एक शंका निरसन करा. घरी कोणी अन्न मागितले, आपण ताट वाढले; पण त्याने न स्वीकारता निघून गेल्यास अन्नाचे काय कराल?" तो म्हणाला, "नष्ट करणार नाही; घरात ठेवेन." ते म्हणाले, "म्हणजे अन्न तुमच्याकडेच राहिले. तसेच आम्ही तुमचे अपशब्द स्वीकारले नाहीत; ते तुमच्याजवळच राहिले." त्याला चूक उमगली, त्याने क्षमा मागून शिष्यत्व स्वीकारले.

-तात्पर्य:अपमान स्वीकारला नाही तर तो बोलणाऱ्याजवळच राहतो.

बांगलादेशात तब्बल सात वर्षांनंतर लोकांनी निवडून दिलेले सरकार सत्तेवर आले, ही घटना त्या देशासाठीच नव्हे तर संपूर्ण भरतखंडासाठी स्थैर्यदायी ठरू शकते. तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेले हे सरकार दीर्घकाळ चाललेल्या अस्थैर्याला पूर्णविराम देणारे मानले जात आहे.

# तारिक रहमान यांच्यासमोरील संधी आणि आव्हाने

सन २०२४ मधील निवडणूक तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांच्या एकाधिकारशाही कारभारामुळे व विरोधकांच्या बहिष्कारामुळे केवळ औपचारिक ठरली होती. त्यामुळे लोकशाहीची प्रतिष्ठा धोक्यात आली होती.

यानंतरच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये आणि बेरोजगार तरुणांमध्ये असंतोष वाढत गेला. जुलै महिन्यात या असंतोषाचा उद्रेक झाला. पोलीस व प्रशासनानेही शेख हसीना यांना पाठिंबा देण्यास नकार दिल्याने परिस्थिती अधिकच बिघडली. अखेरीस काही आठवड्यांतच त्यांना देश सोडून भारतात आश्रय घ्यावा लागला. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी नेते व काही सुजाण व्यक्तींनी एकत्र येत हंगामी सरकार स्थापन केले. या सरकारचे प्रमुख सल्लागार, नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस यांनी फेब्रुवारी २०२६ पर्यंत निवडणुका घेण्याचे आश्वासन दिले होते. काही त्रुटी वगळता हे



आश्वासन त्यांनी पाळले, हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

हसीना यांच्या सत्ताधोरणाचा फटका अवामी लीग या पक्षाला बसला आणि त्याची मान्यता रद्द झाली. परिणामी या प्रमुख राजकीय प्रवाहाला निवडणुकीपासून वंचित राहावे लागले. त्यामुळे मतदारांना पुरेसे पर्याय उपलब्ध होते का, हा प्रश्न उपस्थित होतो. तरीही मतदारांसमोर तीन प्रमुख पर्याय होते — नॅशनल सिटिझन्स पार्टी हा युवकांचा पक्ष, जमाते इस्लामी हा रूढीवादी पक्ष आणि मध्यममार्गी म्हणून ओळखला जाणारा बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी. मतदारांनी अनुभव आणि स्थैर्याला प्राधान्य देत तिसऱ्या पर्यायाची निवड केली.

तारिक रहमान हे बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान खालेदा झिया यांचे सुपुत्र. खालेदा झिया यांच्या निधनानंतर पक्षाची सूत्रे त्यांच्या हाती आली. प्रचारादरम्यान त्यांनी सर्वसमावेशकतेचा संदेश दिला. डोंगराळ व मैदानी भागातील मुस्लीम, हिंदू, बौद्ध आणि ख्रिस्ती नागरिकांनी सुरक्षित बांगलादेश घडवण्यासाठी साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. विशेषतः हिंदू अल्पसंख्याकांसाठी हा दिलासा देणारा संदेश होता. त्याचप्रमाणे, बांगलादेशाचे धोरण दिल्ली वा रावळपिंडीकडे झुकणारे नसून बांगलादेशकेंद्री असेल, असे स्पष्ट करून त्यांनी स्वायत्ततेचा पुरस्कार केला. बांगलादेशाच्या स्थापनेनंतर पाच दशकांहून अधिक काळ उलटूनही हा देश भारत आणि पाकिस्तान यांच्या सावलीतून पूर्णपणे बाहेर पडलेला नाही.

## ।। अभंगवाणी ।।



सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥

गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# “राजीनामा द्यावा लागेल”; संजय राऊतांचा इशारा

## अलिबाग जमीन वादावरून राजकीय खळबळ; राऊत-नार्वेकर आमने-सामने

**महाईन्यूज । अलिबाग**

**अलिबागमधील म्हात्रोळी गावात जमिनीच्या वादातून हाणामारी झाल्याचा दावा केला जात आहे. या प्रकरणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मात्र, या हाणामारीच्या प्रकणाचा संबंध थेट राहुल नार्वेकर यांच्याशी जोडला जात आहे. कारण या व्हिडीओमध्ये विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर दिसत असून त्यांच्यामागे काही स्थानिक गावकरी दिसत आहेत.**



दरम्यान, शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी हा व्हिडीओ एक्सवर शेअर करत राहुल नार्वेकरांवर टीका केली होती. त्यानंतर या प्रकरणात राहुल नार्वेकर यांनी खुलासा करत आपला त्या प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याचं म्हटलं होतं.

त्यानंतर आज संजय राऊतांनी पुन्हा एकदा यावर मोठं भाष्य केलं. ‘माहिती बाहेर काढली तर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना राजीनामा द्यावा लागेल’, असा मोठा इशारा संजय राऊत यांनी दिला आहे. “माझा जन्म अलिबागचाच आहे, त्यामुळे माझ्याकडे जास्त माहिती आहे. क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाचे चेरमन जक्षय शाह आहेत, ते गुजरातचे आहेत. त्यांनी अलिबागमध्ये अलिकडच्या काळात किती एकर जमीन खरेदी केली? आणि त्याची दलाली कोण करत होतं? संपूर्ण अलिबाग गुजरात लॉबीच्या ताब्यात देण्याची सूत्र कोण हलवत आहे? त्यामुळे मला तोंड उघडायला लावू नका. मी एक नाव घेतलं आहे, जक्षय शाह यांचं. अमित शाह आणि जय शाह यांचा जक्षय शाह हा खास माणूस आहे”, असंही संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

### संजय राऊतांनी काय आरोप केले होते?

“सरकारी मोजणी करण्याकरता अधिकारी हे महाशय गेले, जमिनीचे मोजामाप करायला. ही जागा गुजरातच्या एका गुंतवणूकदाराच्या नजरेत भरली. त्या जागेचे मालक घरात नसताना, त्यांच्या घरी एक लग्न समारंभ होता. ते घरात नाहीत हे पाहून हे अधिकरी त्यांच्या जमिनीवर गेले. मोजणी सुरू केली. त्यांना जेव्हा कळलं की मोजमाप सुरू झाली तेव्हा ते कुटुंब तिथे आले. त्या माऊलींनी अनेकांच्या कानफाट्यात मारल्या, तोही व्हिडीओ समोर येईल. या गुजरातच्या टोलधाडी, भाजपाचे पुढारी, सत्तेवरची मंत्री आणत आहेत. कोकणचं स्मशान करत आहेत. त्याचा भडका या म्हात्रोळी गावात उडाला”

### राहुल नार्वेकरांचे स्पष्टीकरण

“आज सोशल मीडियावर माझ्याबाबत प्रसारित होत असलेल्या व्हिडीओ संदर्भात मी सत्य परिस्थिती स्पष्ट करू इच्छितो. मी परवा माझ्या शेतजमीनीवर जात असताना रस्त्यावर दोन शेतकऱ्यांमध्ये वाद होत असल्याचे माझ्या निदर्शनास आले. त्यावेळी मी फक्त त्यांना शांतपणे वाद मिटवण्याचा सल्ला दिला आणि त्यानंतर माझ्या कामानिमित्त पुढे निघून गेलो. सदर वाद किंवा त्या घटनेशी माझा कोणताही संबंध नाही. त्यामुळे विनाकारण माझे नाव त्या घटनेशी जोडू नये, ही नम्र विनंती”

### नेमकं प्रकरण काय?

खासदार संजय राऊत यांनी एक्सवर एक व्हिडीओ पोस्ट केला. या व्हिडीओमध्ये राहुल नार्वेकर दिसत आहेत. घरात कोणी नसताना राहुल नार्वेकर अधिकाऱ्यांसह जमिनीची मोजणी करायला गेल्याने तिथे गोंधळ निर्माण झाला. यातून हाणामारी झाल्याचा दावा संजय राऊतांनी केला. संजय राऊतांनी व्हिडीओ पोस्ट केल्यानंतर यावरून उलटसुलट चर्चा सुरू झाल्या.

### संजय राऊत काय म्हणाले?

राहुल नार्वेकरांबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला असता संजय राऊत म्हणाले की, “व्हिडीओ पाहिल्यानंतर कळतं, पण नंतर दबाव, काय देवाणघेवाण झाली? कारण मी त्याचं गावातला आहे. ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी. जर आणखी काही समोर आणलं तर विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांना राजीनामा द्यावा लागेल. आता एवढंच सांगतो”, असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

# ‘हिरकणी’ वाघिणीचा चिपळूणच्या दिशेने प्रवास; वन विभागाकडून सतर्कतेच्या सूचना

**महाईन्यूज । चिपळूण**

**कोयना अभयारण्यातील मध्यवर्ती सुरक्षित जंगलात सोडलेल्या हिरकणी वाघिणीची डरकाळी नांदिवसे (ता. चिपळूण) च्या जंगलात ऐकू आली आहे. हिरकणी’च्या एन्ट्रीमुळे नांदिवसे परिसरात उत्सुकतेसोबतच कुतूहल निर्माण झाले आहे. येथील ग्रामस्थांना सतर्कतेच्या सूचना वनविभागाने दिल्या आहेत.**



या संदर्भात सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या मॉनिटरिंग सेंटरकडून प्राप्त झालेल्या जीपीएस सिग्नलनंतर चिपळूण वनविभाग तातडीने सतर्क झाला. बुधवारी सायंकाळी नांदिवसे गावात वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करत त्यांना खबरदारीच्या सूचना दिल्या आहेत.

पेंच व्याघ्र प्रकल्पातील नागलवाडी परिक्षेत्रात ५ फेब्रुवारीला सायंकाळी पाच वाजता एसटीआर ०६ या वाघिणीला पकडण्यात आले. त्यानंतर तिला सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात ६ फेब्रुवारीला रात्री आणण्यात आले.

पशुवैद्यकीय अधिका-यांनी तपासणी केल्यानंतर या वाघिणीला ७ रोजी सकाळी सहाच्या सुमारास कोयना अभयारण्यातील मध्यवर्ती सुरक्षित जंगल क्षेत्रात सोडण्यात आले. त्यानंतर या वाघिणीचा ऐतिहासिक मुक्त संचार सुरू झाला. याआधी एसटीआर ०३ हा बाजी नर वाघ तसेच तारा व चंदा या वाघिणी दाखल झाल्या आहेत. आता त्यांच्या जोडीला नवीन आणलेली ही एसटीआर ०६ म्हणजे हिरकणी वाघीण कोयना वन्यजीव अभयारण्यात व्याघ्र प्रजननवृद्धीसाठी सोडण्यात आली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील जैवविविधतेने व अनेक दुर्मिळ प्रजातीने समृद्ध असा हा ११६५ चौरस किलोमीटरचा परिसर सातारा, सांगली, कोल्हापूर अशा तीन जिह्यात पसरलेला शासनाचा एक महत्वकांक्षी प्रकल्प आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोयना अभयारण्यात सोडलेल्या ‘हिरकणी’चा लोकेशन सिग्नल अवघ्या पाचव्या दिवशी नांदिवसेच्या डोंगराळ भागात आढळून आला. यानंतर प्रकल्पाचा मॉनिटरिंग सेंटरने चिपळूण वनविभागाला दक्ष केले.

> "चिपळूण तालुक्यातील नांदिवसे गावच्या डोंगराळ भागात जिथे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची हद्द आहे. त्या परिसरात हिरकणी ची इंट्री झाली आहे. परंतु गावातील ग्रामस्थांना त्याचा कोणताही धोका नाही. वनविभागाच्या सतर्कतेमुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून पुढील काही दिवस परिसरावर बारकाईने नजर ठेवली जाणार आहे. येथील नागरिकांनी जंगलात जाऊ नये. तसेच वाघ किंवा इतर कोणताही प्राणी दिसल्यास प्रथम वनविभागाची संपर्क करावा."
>
> -सताप्पा सावंत, वनपाल चिपळूण

बुधवारी सायंकाळी वनअधिका-यांनी त्वरित पथकासह नांदिवसे येथे भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. ग्रामस्थांना डोंगर परिसरात एकटे जाणे टाळावे, गुरेढोरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत, तसेच रात्रीच्या वेळी विशेष सतर्कता बाळगावी, अशा सूचना देण्यात आल्या. चिपळूणचे वनपाल सताप्पा सावंत याबाबत माहिती देताना म्हणाले की , वाघिणीचा हा नैसर्गिक वावर असून नागरिकांनी कोणतीही अफवा पसरवू नये. ‘हिरकणी’ला कुठलाही त्रास न देता वनविभागाला सहकार्य करावे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून वाघिणीच्या हालचालींवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

# चुकीच्या हेअरकटविरोधात सात वर्षे लढा!

## मॉडेलला २५ लाखांची भरपाई द्या; सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्लीतल्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये बॅड हेअरकट केल्याने महिला संतापली होती. तिने हॉटेलविरोधात कोर्टात दावा केला आणि २ कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी केली होती. सदर महिलेने सात वर्षे लढा दिला. ज्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी हॉटेलला २५ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. आशना रॉय असं या महिलेचं नाव आहे. न्यायालयाने या प्रकरणात ITC MAURYA या दिल्लीतल्या हॉटेलला सदर महिलेला २५ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.**





आशना रॉय नावाच्या महिलेने २०१८ मध्ये एक याचिका दाखल केली होती. आशना रॉय ही एक मॉडेल आहे. तिने सांगितलं की आयटीसी मोर्या हॉटेलमध्ये तिचा हेअरकट चुकीच्या पद्धतीने करण्यात आला. याची भरपाई म्हणून मला २ कोटी रुपये मिळावेत. राष्ट्रीय ग्राहक तंटामुक्त आयोगाकडेही तिने धाव घेतली होती. प्रकरण सात वर्षे चाललं आणि जेव्हा सर्वोच्च न्यायालयात गेलं तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केलं की आशना रॉय यांनी जे पुरावे न्यायालयात सादर केले आहेत ते पुरेसे नाहीत. फोटो कॉपी पुरावे म्हणून जोण्यात आल्या आहेत त्यामुळे आम्ही त्या ग्राह्य धरणार नाही.

### हेअरकटचा वाद न्यायालयात कसा पोहचला?

आशना रॉय ने सुरुवातीला ग्राहक मंचाकडे या संदर्भात तक्रार केली. आयटीसी मोर्या हॉटेलमध्ये असलेल्या सलूनमध्ये तिने केस कापले आणि तिचा हेअरकट वाईट झाला म्हणून तिने ही धाव घेतली होती. साधारण वर्षभराने आयोगाने निर्णय दिला की या प्रकरणात आयटीसी हॉटेलची चूक आहे त्यांनी दोन कोटी रुपये भरपाई द्यावी. या प्रकरणानंतर आयटीसी ग्रुपने सर्वोच्च न्यायालयात २०२३ मध्ये धाव घेतली. राष्ट्रीय ग्राहक तंटामुक्त आयोगाचा निकालाला आव्हान देण्यात आलं. जो निर्णय आयोगाने दिला आहे तो आम्हाला मान्य नाही. भरपाईची रक्कम खूप जास्त आहे आणि त्यासाठी लागणारे आवश्यक असे पुरावेही आशनाकडे नाहीत असाही दावा करण्यात आला. ज्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात उभं राहिलं. आता सर्वोच्च न्यायालयाने सदर महिलेला २५ लाख रुपये भरपाई द्या असे आदेश आयटीसी मौर्याला दिले आहेत.

### दोन कोटींची भरपाई न्यायालयाने का नाकारली?

सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाचा निर्णय बदलला. जस्टिस राजेश बिंदल आणि जस्टिस मनमोहन यांच्या बेंचने हा निर्णय दिला की आशना रॉय या मॉडेलने एका हेअऱकटमुळे तिचं करिअर उद्ध्वस्त झालं हे म्हटलं होतं. पण तिला हे सिद्ध करता आलेलं नाही. तिच्या वकिलांनी केलेले दावे पोकळ ठरले त्यामुळे भरपाईची रक्कम दोन कोटी रुपये नाही तर २५ लाख रुपये असणार आहे. न्यायालयाने हेदेखील सांगितलं की नुकसान झालं आहे, वाईट हेअरकट आहे हे दाखवण्यासाठी आशना रॉय यांच्या वतीने जे पुरावे सादर केले त्यात काही ई मेल आणि फोटो कॉपी आहेत. कोट्यवधी रुपयांची भरपाई मागत आहेत तर तसे ठोस पुरावे आणा. शिवाय तपासात हे देखील आढळून आलं आहे की जी कागदपत्रं सादर करण्यात आली ती हेअरकटच्या दिवसाच्या आधीची होती. या घटनेशी त्या कागदपत्रांचा काहीच संबंध नव्हता. त्यामुळे भरपाईची रक्कम २५ लाख करण्यात आली.

# बांगलादेशाच्या नव्या सरकारच्या शपथविधीकडे जगाचे लक्ष

**महाईन्यूज । ढाका**

**शुक्रवारी रात्री बांग्लादेशातील निवडणूक आयोगाने निवडणुकीत विजयी झालेल्या नवनिर्वाचित खासदारांच्या नावांची अधिसूचना (गॅझेट) प्रसिद्ध केली. आता या अधिसूचनेमुळे विजयी खासदारांच्या शपथविधीचा आणि संसदेचा कार्यभार स्वीकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लवकरच नवीन सरकारच्या शपथविधीचा कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. हा शपथविधीचा कार्यक्रम मंगळवारी (ता. १७) रोजी पार पडणार आहे.**



### १३ देशाचे प्रमुख येणार

शपथविधीपूर्वी, अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनी १३ देशांतील नेत्यांना या समारंभाला उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित केले आहे. त्यामध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही समावेश आहे, असे एएनआयने 'प्रथम आलो'च्या हवाल्याने वृत्त दिले आहे. आमंत्रित देशांमध्ये भारत, चीन, सौदी अरेबिया, तुर्की, पाकिस्तान, संयुक्त अरब अमिराती, कतार, मलेशिया, ब्रुनेई, श्रीलंका, नेपाळ, मालदीव आणि भूतान यांचा समावेश आहे. २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाच्या प्रचंड विजयानंतर हा समारंभ राष्ट्रीय संसदेच्या दक्षिण प्लाझा येथे आयोजित केला जाईल.

या कार्यक्रमाला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक देशांच्या प्रमुखांना आमंत्रण देण्यात आले आहे. बांग्लादेशात नॅशनलिस्ट पार्टीने (बीएनपी) अध्यक्ष तारिक रहमान यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुकीत विजय मिळवला आहे. तारिक रहमान हे पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. निवडणुकीतील विजयानंतर त्यांनी जनतेला संबोधित करताना देशात कोणत्याही परिस्थितीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले आहे. तसेच सुरक्षित आणि मानवाधिकारांचा सन्मान करणारा देश घडवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, अशी विनंती त्यांनी यावेळी केली होती. देश पुन्हा उभा करण्यासाठी प्रत्येक नागरिकाला जबाबदारीने भूमिका बजावावी लागेल. देशात कायदा आणि सुव्यवस्था राखणे याला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे, असे रहमान पत्रकार परिषदेत म्हणाले. तसेच या विजयाला त्यांनी 'जनतेचा विजय' असेही म्हटले आहे.



# अभिनेत्री सुरभी ज्योतीने दिली गुडन्यूज

अभिनेत्री सुरभी ज्योतीने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर चाहत्यांना गुडन्यूज दिली आहे. सुरभीच्या घरी आता एका नव्या सदस्याचे आगमन होणार असून लवकरच ती आई होणार आहे दरम्यान, २७ ऑक्टोबर २०२४ रोजी सुरभीने अभिनेता सुमित सूरीबरोबर लग्नबंधनात अडकली. सुरभी व सुमित यांचा शाही विवाह सोहळा उत्तराखंडच्या जिम कॉर्बेटमधल्या आहाना रिसॉर्टमध्ये पार पडला. आता लग्नाच्या दीड वर्षानंतर या जोडप्याच्या आयुष्यात नवा पाहूणा येणार आहे. नुकताच सुरभीने इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर करत ती आई होणार असल्याची बातमी दिली आहे. या फोटोसोबत अभिनेत्रीने एक खास कॅप्शनही लिहिले आहे, “आपल्या आयुष्याचा सर्वात सुंदर प्रवास आता सुरू होणार आहे. आपलं छोटंसं गोड बाळ या जूनमध्ये येणार आहे.” तिने शेअर केलेला हा फोटो खूप चर्चेत असून टीव्ही कलाकार तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत. कोण आहे सुरभी ज्योती? सुरभी ज्योती ही हिंदी टीव्ही इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका ‘कबूल है’मध्ये जो याच्या भूमिकेत ती झळकली. याशिवाय तिने ‘नागिन’, ‘गुनाह’ आणि ‘कोई लोट के आया है’ यासारख्या अनेक मालिकांमध्ये काम केले.

# प्रार्थना बोलली लाइफ स्टाइलबद्दल



मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री प्रार्थना बेहेरे (PRARTHANA BEHERE) नेहमी विविध कारणांमुळे चर्चेत असते. तिने अभिनयक्षेत्रात ‘कॉफी आणि बरंच काही’ या चित्रपटातून पदार्पण केले. त्यानंतर ती रातोरात स्टार कलाकार झाली. यानंतर तिने एकामागूनएक चित्रपट करत आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अभिनेत्रीने तिच्या आलिशान लाईफस्टाईलबद्दल सविस्तर माहिती दिली आहे.प्रार्थना (PRARTHANA BEHERE ) वेगवेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांसमोर आली. तिची खऱ्या आयुष्यातील आलिशान लाईफस्टाईलचीही नेहमीच चर्चा होते. मात्र अशी लाईफस्टाईल आत्मसात करण्यासाठी किती खर्च होतो, तसेच अभिनेत्री म्हणून पैसे मिळतात का? या सगळ्यावर अभिनेत्रीने सविस्तर भाष्य केले आहे. “हो, पैसे मिळतात..भरपूर मिळतात. माझं तरी आयुष्य लक्झरियस आहे. कदाचित माझ्या नवऱ्यामुळे असेल. पण शेवटी आपल्या गरजांवर ते अवलंबून असतं.” असे प्रार्थनाने सांगितले. पुढे बोलताना प्रार्थना म्हणाली, “मला इंडस्ट्रीत १५ वर्ष झाली पण माझ्या नावावर अजून घर नाही. माझ्या नावावर फक्त कार आहे. मी माझ्या गरजा काय ते पाहिलं. मला घर कधी महत्वाचं नव्हतं. इतर गोष्टी महत्वाच्या होत्या त्यामुळे मी त्यावर लक्ष दिलं. त्यावर पैसा खर्च केला.” असे तिने सांगितले. आधी नवऱ्याच्या दोन गाड्या आहेत त्यातच मी फिरायचे. तसंच एक अभिनेत्री म्हणून लाईफस्टाईल मेन्टेन करायला लागते आणि सगळ्यात खूप खर्च येतो, असेही ती सांगायला विसरली नाही. “जेवढं मी कमावते ते सगळं मी लाईफस्टाईलवर घालवते. अगदी नखांपासून ते हेअर ड्रेसर, स्किन या सगळ्यासाठी किती पैसे लागतात. म्हणून तर अभिनेत्री एवढं कमावतात.” असेही तिने नमूद केले.

# श्रीलीला एमबीबीएस !

पुष्पा २ मधील किसिक गाण्याने चर्चेत आलेली अभिनेत्री श्रीलीला ही डॉक्टर झाली आहे. तिने एमबीबीएस पदवी पूर्ण करत डॉक्टर होण्याचा मानाचा टप्पा गाठला आहे. तिच्या पदवीदान सोहळ्यातील गाऊन आणि कॅप परिधान केलेले फोटो व व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून, चाहत्यांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सलग चित्रपटांचे चित्रीकरण, प्रमोशनल कार्यक्रम आणि प्रवास या सगळ्या धावपळीत श्रौलीलाने वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. मनोरंजन क्षेत्रातील अनेक कलाकार शिक्षण अर्धवट सोडतात. अशा पार्श्वभूमीवर श्रीलीलाने एमबीबीएस पूर्ण करणे हे विशेष उल्लेखनीय यश मानले जात आहे. श्रीलीलाने कन्नड, तेलुगू चित्रपटसृष्टीत स्वतंत्र ओळख निर्माण केली. विविध भाषांतील प्रेक्षकांशी सहज संवाद साधण्याची तिची क्षमता आणि स्क्रीनवरील उपस्थिती यामुळे तिचा पॅन-इंडिया दर्जा अधिक बळकट झाला आहे. तिच्या बॉलीवूड पदार्पणाबाबतही चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. ती लवकरच दिग्दर्शक अनुराग बसू यांच्या म्युझिक रोमँटिक चित्रपटात कार्तिक आर्यनसोबत झळकणार आहे.



# भारताच्या लेकींनी पाकिस्तानला चारली धूळ

## ५९ चेंडू राखून मिळवला विजय; राधा यादवच्या नेतृत्त्वाखाली चमकदार कामगिरी

**महाईन्यूज । बँकॉक**

**महिलांचा रायझिंग स्टार आशिया चषक २०२६ बँकॉकमध्ये खेळवला जात आहे. या स्पर्धेत आज म्हणजेच १५ फेब्रुवारीला भारत अ आणि पाकिस्तान अ महिला संघांमध्ये सामना खेळवला गेला. या सामन्यात भारताने पाकिस्तान संघावर एकतर्फी विजय मिळवला. गोलंदाजीत भारताच्या गोलंदाजांनी चमकदार कामगिरी करत अवघ्या १० षटकांत संघाने हा सामना जिंकला आहे.**




राधा यादव रायझिंग स्टार आशिया चषकात भारताच्या महिला संघाचं नेतृत्त्व करत आहे. स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात संघाला युएईच्या अ संघाविरूद्ध पराभव पत्करावा लागला होता. पण पाकिस्तानविरूद्ध सामन्यात टीम इंडियाने चमकदार कामगिरी करत दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयासह भारताच्या अ संघाने स्पर्धेतील आपली मोहिम कायम ठेवली आहे.

पाकिस्तानने दिलेल्या ९४ धावांचं लक्ष्य टीम इंडियाने १०.१ षटकांत पूर्ण केलं. भारताकडून हुमैरा काझी पहिल्या षटकात झेलबाद झाली. यानंतर अनुष्का शर्मा व वृंदा दिनेश यांनी ५० चेंडूत ७९ धावांची भागीदारी केली. अनुष्का २४ धावांवर झेलबाद झाली. यानंतर वृंदा दिनेशने २९ चेंडूत १२ चौकारांसह ५५ धावांचा नाबाद खेळी केली आणि संघाच्या विजयाचा हिरो ठरली. तर तेजल हसबनीसने ५ चेंडूत १ चौकार व षटकारांसह १२ धावा केल्या. यासह टीम इंडियाने दणदणीत विजय मिळवला.

पाकिस्तान अ संघाने या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पण हा निर्णय संघाने चुकीचा ठरवला. पाकिस्तानने पहिल्याच षटकात विकेट गमावली. यानंतर शावाल झुल्फिकार हिने २३ धावा केल्या. तर गुल रूख हिने २१ धावा अन् अनोशा नसीरने १७ धावांचं योगदान दिलं. याशिवाय एकही पाकिस्तानी फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकला नाही आणि परिणामी संघ ९३ धावांवर सर्वबाद झाला. भारताकडून साईमा ठाकोर, प्रेमा रावत व राधा यादव यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तर जिन्तीमनी कलिता, मिन्नू मणी यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

आज भारताचा वरिष्ठ पुरूष संघ टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये पाकिस्तानविरूद्ध सामना खेळणार आहे. हा सामना कोलंबोमधील आर प्रेमदासा स्टेडियममध्ये होणार आहे. कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या भारत-पाकिस्तान सामन्यातील चुरस वेगळी असते. आता या सामन्यापूर्वी भारताच्या अ महिला संघाने चमकदार कामगिरी करत विजय नोंदवला आहे.

# वेस्ट इंडिजची टी-२० वर्ल्डकपच्या सुपर-८मध्ये धडक

**महाईन्यूज । मुंबई**

**नेपाळ आणि वेस्ट इंडिज यांच्यातील टी-२० विश्वचषक सामन्यात वेस्ट इंडिजने उत्कृष्ट कामगिरी केली. यासह नेपाळवर ५ षटकं राखून व धावांनी विजय मिळवला. या विजयाच्या बळावर वेस्ट इंडिज सुपर-८ फेरीसाठी पात्र ठरला आहे. तर नेपाळचा संघ गट टप्प्यातून बाहेर पडला आहे. जेसन होल्डर, शिमरॉन हेटमायर व शे होप यांनी चमकदार कामगिरी केली आहे.**




नेपाळ संघ प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत जेसन होल्डरच्या भेदक गोलंदाजीसमोर ८ बाद १३३ धावा करण्यात यशस्वी ठरला. तर प्रत्युत्तरात विंडिज संघाने अवघ्या १५.२ षटकांत १३४ धावा करत संघाला सहज विजय मिळवून दिला.

नेपाळने दिलेल्या १३४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजची सुरूवात चांगली झाली. ब्रँडन किंग व शे होप यांनी ४३ धावांची भागीदारी रचली. यानंतर किंग २२ धावा करत झेलबाद झाला. यानंतर शे होप व शिमरॉन हेटमायर या दोघांनी संघाला सहज विजय मिळवून दिला. कर्णधार होपने ४४ चेंडूत ५ चौकार व ३ षटकारांसह ६१ धावांची खेळी केली. तर शिमरॉन हेटमायरने ३२ चेंडूत ४ चौकार व २ षटकारांसह ४६ धावांची खेळी केली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ९१ धावांची भागीदारी रचत ९ विकेट्सने सहज विजय मिळवून दिला.

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकत नेपाळला फलंदाजीसाठी पाचारण केलं. नेपाळची सुरूवात खूप खराब झाली, ज्यामुळे संघ मोठी धावसंख्या उभारू शकला नाही. संघाकडून फक्त दीपेंद्र सिंग ऐरीने मोठी खेळी केली. दीपेंद्रने ४७ चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह ५८ धावा केल्या. तर सोमपाल कामीने २६ धावांची खेळी केली. याशिवाय सर्व फलंदाज झटपट बाद झाले. वेस्ट इंडिजकडून जेसन होल्डरने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. तर हुसैन, मॅथ्यू फॉर्डे, शमार जोसेफ, रॉस्टन चेस यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतल्या.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज™
ePaper
। सोमवार ।
दि. 16 फेब्रुवारी 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी चिंचवडमध्ये 18वे संमेलन!


## १८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी उमेश गाड

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**औद्योगिक नगरी पिंपरी-चिंचवडमध्ये रंगणाऱ्या १८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी गोव्याचे ज्येष्ठ लेखक आणि संशोधक उमेश गाड यांची निवड करण्यात आली आहे. मराठी साहित्य मंडळातर्फे आयोजित करण्यात येणारा हा अक्षरोत्सव यंदा पिंपरीतील महात्मा फुले महाविद्यालयाच्या प्रांगणात संपन्न होणार असून, या निवडीमुळे साहित्य वर्तुळात उत्साहाचे वातावरण आहे. गोव्याच्या साहित्यिक परंपरेचा वारसा जतन करणाऱ्या एका व्यासंगी संशोधकाच्या नेतृत्वाखाली हे संमेलन पार पडणार असल्याने या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.**

१८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नवनियुक्त अध्यक्ष उमेश गाड यांना सामाजिक आणि संघर्षाचा वारसा लाभला आहे. ते गोव्याचे थोर स्वातंत्र्यसैनिक शंकर गाड यांचे सुपुत्र असून, मराठी भाषा आंदोलनात त्यांनी स्वतःला सक्रियपणे झोकून दिले आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी आणि मराठी भाषेचा संवर्धन व्हावे, यासाठी ते गेली अनेक वर्षे अविरत कार्यरत आहेत. यासोबतच विविध वृत्तपत्रांमधून ते आपल्या 'स्फूट' लेखनातून सामाजिक विषयांवर भाष्य करत असतात.



### परिसंवाद आणि विशेष आकर्षणे

संमेलनाच्या दुपारच्या सत्रात "आजही दलित साहित्य उपेक्षित का?" या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर परिसंवाद रंगणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. निता बोडके असतील, तर डॉ. प्रवीण उपलेंचवार (नागपूर) आणि बापूसाहेब पाटील-ठाकरे (जळगाव) हे वक्ते म्हणून आपले विचार मांडतील. याशिवाय, राज्यभरातील नामवंत कवींच्या उपस्थितीत होणारी काव्यस्पर्धा आणि काव्यसंमेलन ही साहित्यप्रेमींसाठी एक मोठी पर्वणी ठरणार आहे.

### संमेलनाचे उदघाटन आणि प्रमुख उपस्थिती

या साहित्य सोहळ्याचे उद्घाटन पणजी येथील इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझाचे अध्यक्ष दशरथ परब यांच्या हस्ते होणार आहे. महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले हे स्वागताध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळतील. याप्रसंगी माजी संमेलनाध्यक्ष उत्तम कांबळे, ॲड. राम कांडगे, डॉ. जयप्रकाश घुमटकर, ललिता गवांदे, सुरेश लोहार, डॉ. संजय मेस्त्री आणि डॉ. विनायकराव जाधव यांसारख्या दिग्गज साहित्यिकांची मांदियाळी उपस्थित राहणार आहे.

### पुरस्कार आणि सन्मान

त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये गोमंतक साहित्य सेवक मंडळाचा 'आदर्श पत्रकार पुरस्कार', बाळशास्त्री जांभेकर 'कर्मयोगी पुरस्कार', मराठी साहित्य मंडळाचा 'आदर्श पुरस्कार' आणि 'महात्मा गांधी प्रेरणा पुरस्कार' अशा विविध मानाच्या सन्मानांचा समावेश आहे. उमेश गाड यांचा विविध सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांमधील सहभाग अत्यंत मोलाचा असून, सध्या ते अनेक महत्त्वाच्या संस्थांमध्ये नेतृत्वाची धुरा सांभाळत आहेत. यामध्ये प्रामुख्याने गोवा लढा स्वातंत्र्य सैनिक वारसदार संघ (कराड), स्वामी विवेकानंद संस्था (पेडणे) आणि पेडणे उच्च माध्यमिक विद्यालय यांसारख्या संस्थांचा समावेश आहे. यासोबतच वळपे-पेडणे येथील संत सोहिरोबानाथ आंबीये कला व वाणिज्य महाविद्यालय, उत्तर गोवा पत्रकार संघ तसेच विविध कला व सांस्कृतिक संस्थांमध्ये ते पदाधिकारी म्हणून सक्रिय कार्यरत आहेत. या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी समाजकार्य आणि सांस्कृतिक संवर्धनाचा वारसा समर्थपणे पुढे नेला आहे.

# पीएमआरडीएचे मोठे पाऊल; पाच तालुक्यांत १७६ कोटींचे सांडपाणी प्रकल्प

## २७ गावांत एसटीपी, सिव्हर नेटवर्क उभारणी; नद्यांचे प्रदूषण रोखण्यावर भर

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्यातर्फे पुणे महानगर हद्दीतील गावांसाठी मैला व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. खेड, मावळ, मुळशी, हवेली आणि शिरूर या पाच तालुक्यांतील एकूण २७ गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्रे, सिव्हर नेटवर्क आणि संबंधित कामांसाठी तब्बल १७६ कोटी १७ लाख ७९ हजार ५६६ रुपयांच्या पाच स्वतंत्र निविदा ६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केल्या आहेत.**




या प्रकल्पांतर्गत डिझाइन, पुरवठा, बांधकाम, उभारणी व कार्यान्वयन (डिझाइन- सप्लाय- कन्स्ट्रक्शन- इरेक्शन- कमिशनिंग) यासह पाच वर्षे संचालन व देखभाल (ओ अँड एम) तसेच पाच वर्षांचा डिफेक्ट लायबिलिटी पीरियड (डीएलपी) कंत्राटदारावर राहणार आहे. दीड महिन्याच्या निविदा प्रक्रियेनंतर कंत्राटदारांची नियुक्ती करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.

खेड तालुक्यातील सात गावांसाठी तीन क्लस्टरमध्ये १,३५,१०,१२,८८८ रुपयांची निविदा काढली आहे. मावळ तालुक्यातील दोन गावांसाठी ४,५३,४९,०१६ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. मुळशी तालुक्यातील सहा गावांसाठी २,७२,१३,४८,३४७ रुपयांचा, तर हवेली तालुक्यातील आठ गावांसाठी पाच क्लस्टरमध्ये ३,२०,१६,७८,३८६ रुपयांचा प्रकल्प हाती घेतला जाईल. शिरूर तालुक्यातील चार गावांसाठी २,४४,२३,९०,९२९ रुपयांची निविदा काढली आहे. या सर्व निविदांची एकत्रित किंमत १७६ कोटी १७ लाख ७९ हजार ५६६ रुपये इतकी असून, ग्रामीण व उपनगरी भागातील सांडपाणी व्यवस्थापन सुधारण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पर्यावरण संवर्धन, भूजल प्रदूषण रोखणे आणि स्वच्छतेच्या दृष्टीने फायदा होणार आहे.

### नदी प्रदूषणाला बसणार आळा

- या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांमुळे मैला व सांडपाणी थेट नद्यांमध्ये सोडले जाणार नाही. गावांमधील सांडपाणी प्रक्रिया करूनच पुढे सोडण्यात येणार असल्याने पुणे महान गर हद्दीतील नद्यांचे प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे.
- विशेषतः इंद्रायणी, पवना आणि मुळा नद्यांमधील वाढते प्रदूषण लक्षात घेता हे प्रकल्प महत्त्वाचे मानले जात आहेत. पर्यावरण संरक्षणासोबतच नदीपात्र आणि भूजल गुणवत्ता सुधारण्यासही या उपक्रमाचा फायदा होईल.

### इंद्रायणी, पवना नदी सुधारसाठी लवकरच निविदा

या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांमुळे मैला व सांडपाणी थेट नद्यांमध्ये सोडले जाणार नाही. गावांमधील सांडपाणी प्रक्रिया करूनच पुढे सोडण्यात येणार असल्याने पुणे महानगर हद्दीतील नद्यांचे प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. विशेषतः इंद्रायणी, पवना आणि मुळा नद्यांमधील वाढते प्रदूषण लक्षात घेता हे प्रकल्प महत्त्वाचे मानले जात आहेत. पर्यावरण संरक्षणासोबतच नदीपात्र आणि भूजल गुणवत्ता सुधारण्यासही या उपक्रमाचा फायदा होईल.

# पिंपळे निलखमध्ये बीआरटी रोडवर ट्रॅव्हल्स बसमुळे वाहतूक कोंडी

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**जगताप डेअरी चौक ते सांगवी फाटा दरम्यानच्या बीआरटी रोडलगत ट्रॅव्हल्स बस मोठ्या प्रमाणावर उभा असतात. यामुळे वाहतुकीचा मोठा खोळंबा होत असून, अपघाताचा धोका वाढल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. विशेषतः सायंकाळी 5 नंतर ट्रॅव्हल्स बसची मोठी वर्दळ सुरू होत असून, त्यामुळे या मार्गावर वाहनचालकांना अचानक थांबावे लागत आहे.**




या परिसरात बस रस्त्याच्या कडेला थांबवल्या जात असल्याने मागून येणाऱ्या वेगवान वाहनांना अचानक बेक मारावा लागत आहे. परिणामी, दुचाकीस्वार व चारचाकी वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. अनेकदा या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊन नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. ट्रॅव्हल्स चालकांकडून रस्त्याच्या नियमांचे उल्लंघन होत असतानाही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. दररोज कोंडी होते, अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. तरीही प्रशासन दुर्लक्ष करत आहे.

> ट्रॅव्हल्स-चालकांना विशेष थांबे नेमून दिले आहेत. या भागात मानकर चौक, काळेवाडी फाटा, जगताप डेअरी, औंध हॉस्पिटल असे थांबे दिले आहेत. तरीसुद्धा असे रस्त्यावर आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल. यामध्ये कारवाईसाठीची काही प्रोसेस आहे. त्यामध्ये ते बसत असतील तर आम्ही नक्की कारवाई करू
>
> **संतोष खैरे,** वाहतूक पोलिस कॉन्स्टेबल, सांगवी


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025-26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration &
Document Upload
07 – 21July 2025
(10:00AM-5:00PM)
Document Verification &
Form Confirmation
(Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025
(10:00AM-5:00 PM)
Display of
Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission
(Online / at FC)
26 – 28 July 2025
(10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
Bring all original + Xerox copies of documents
Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046